नियमित फौजदारी केस नं. ५६/२०१५
नि. क्र. ९८ लगत

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१**

**माझे नाव –** संजय रमेश पिलणकर,
**वय –** ५१ वर्ष, **धंदा–** नोकरी (सहा.पोलीस उपनिरिक्षक, ब.क्र.१०६३)
**सध्या नेमणूक–** पोलीस ठाणे रत्नागिरी शहर, जि.रत्नागिरी

**अभियोग पक्षातर्फे सरतपास अभियोक्ता श्रीमती एस.आर.वनकर यांचेकडून शपथेवर सुरु.**

दिनांक ०८/०३/२०१४ रोजी मी पोलिस ठाणे संगमेश्वर येथे पोलिस नाईक या पदावर कार्यरत होतो. दिनांक ०८/०३/२०१४ रोजी रात्री ०८.०० वाजलेपासून ते दिनांक ०९/०३/२०१४ रोजी सकाळी ०८.०० वाजेपर्यंत मी पोलिस ठाणे संगमेश्वर येथे ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्यावर होतो. दिनांक ०९/०३/२०१४ रोजी पहाटे ०५.०० वाजता प्रविण विनायक चव्हाण रा. जुवे व राजेश मयेकर हे दोघेजण पोलीस ठाणे संगमेश्वर येथे आले. प्रविण चव्हाण याच्या हातात १२ बोअरची सिंगल बॅरल बंदूक होती. तसेच त्याचे सोबत चार्जींग टॉर्च होती. त्यावेळी प्रविण चव्हाण याने सांगितले की, तो व त्याचा मित्र संदेश मुरकर हे दोघे रात्री शिकारीसाठी गेले होते. संगमेश्वर आठवडा बाजाराच्या पलीकडे कोंड असुर्डे असे गाव आहे. त्या कोंड असुर्डे गावी शिकारीसाठी आम्ही गेलो होतो असे प्रविण चव्हाण यांनी सांगितले होते. त्यांनी पुढे असेही सांगितले की, "त्यावेळी रानटी जनावराचा आवाज आला. त्यावेळी संदेश मुरकर याचेकडे टॉर्च होती. संदेशने ती टॉर्च माझेकडे दिली. माझ्या हातातील काडतुस लोड केलेली बंदूक मी संदेश मुरकर याच्या हातात देत होतो. त्यावेळी माझा पाय घसरला. त्यामुळे माझे हातातील ती बंदूक जमीनीवर आपटली. त्यामुळे त्या बंदुकीतून बार झाला. बंदुकीतील गोळी निघुन संदेश मुरकर याच्या पाठीमागे डाव्या बाजूला लागली. त्यानंतर संदेश मुरकर तोंडावर पडला. तो घसरत खाली उताराला गेला. त्यानंतर मी जावून पाहीले असता संदेश मुरकर याच्या पाठीला भोक पडले होते व त्यातून रक्त येत होते. त्यावर मी घाबरुन थोडावेळ तेथेच थांबलो. ही सर्व घटना दिनांक ०९/०३/२०१४ रोजी पहाटे १.०० वाजता घडली. त्यानंतर पहाटे १.४५ वाजता मी तेथून निघालो. आम्ही आठवडा, संगमेश्वर येथे आमची

मोटार सायकल लावली होती. तेथे मी आलो. तेथुन मी रत्नागिरी येथे राहण्या–या राजेश मयेकर यांना फोन कॉल केला, परंतू त्यांनी उचलला नाही. मी त्याचे मोबाईल क्र. ९४२३०४८७७७ या क्रमांकावर फोन केला होता. राजेश मयेकर याने फोन उचलला नाही त्यामुळे पहाटे ०३.३० वाजता मी संगमेश्वर आठवडा बाजार येथून राजेश मयेकर याच्या थिबा पॅलेस रत्नागिरी जवळील घरी जाण्यासाठी निघालो. त्यानंतर मी राजेश मयेकर याच्या घरी जावून त्याला घडलेला सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर एक खाजगी गाडी करुन मी, राजेश मयेकर व राजा शेख असे आम्ही तिघे संगमेश्वर येथे आलो. येताना मी माझी सिंगल बॅरल बंदूक व टॉर्च सोबत घेवून आलो होतो. मी माझेजवळील मोटार सायकल रत्नागिरी येथे ठेवली आहे" अशी हकीगत प्रविण चव्हाण याने सांगितली. मी त्याप्रमाणे सर्व लिहून घेतले. घडलेल्या प्रकाराची कल्पना मी वरिष्ठांना दिली. त्या जबाबावरुन मी अपराध क्र. १४/२०१४ ची नोंद केली. (सदरचा जबाब साक्षीदाराला दाखवून त्याबाबत दस्त सिध्द करणेसाठी सहा.सरकारी अभियोक्ता या प्रश्न विचारत आहेत. आरोपी क्र. १ चे वकील श्री.चवंडे गैरहजर आहेत. नि.९७ कडे आरोपी क्र. १ ने प्रकरणाची चौकशी तहकुब करण्यासाठी अर्ज दिला आहे. त्यानुसार, संबंधित दस्ताचे स्वरुप व महत्व विचारात घेता साक्षीदाराची पुढील तपासणी दिनांक २५/०१/२०२३ पर्यंत तहकुब).

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

BALIRAM DATTATRAYA TARE

Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2023.01.19 11:19:04 +0530

(ब. द. तारे)

दिनांक –११.०१.२०२३

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

Evidence in RCC no. 56-2015

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | R. Y. Salvi (Jr. Clerk) |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 11/01/2023 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 11/01/2023 |
| Evidence uploaded on | : | 19/01/2023 |